वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ४ फेब्रुवारी १९८९

प्रति,

कुलगुरु,
पुणे विद्यापीठ,
पुणे.

कुलगुरु,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

प्रबंधक [ओरीजनल साईड/अपीलेट साईड
उच्च न्यायालय,
मुंबई

विषय :- नवीन वैद्यकीय महाविद्यालय सुरु करणेबाबत.

महोदय,

शासनाने भारती विद्यापीठ पुणे व डी. वाय. पाटील शिक्षण प्रसारक मंडळ कोल्हापूर या खाजगी संस्थांना विना अनुदान तत्वावर नवीन वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याची परवानगी दिली आहे. सोबत शासन निर्णयाची प्रत आपल्या माहितीसाठी व पुढील कार्यवाहीकरिता पाठविली आहे.

आपणास विनंती करण्यात येते की, यापुढील कार्यवाही त्वरीत करुन केलेल्या कार्यवाहीची प्रत शासनास पाठवावी.

आपली

[श्रीमती माधुरी कोकणे] ]
सहाय्यक सचिव,
महाराष्ट्र शासन.

ना अनुदान तत्त्वावर [illegible]
काढण्यात अटी व शर्ती.

महाराष्ट्र शासन,
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्रमांक: एमईडी-१६८८/३०८७/एमईडी ४, अ.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक १७ फेब्रुवारी, १९८९.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र राज्यात वैद्यकीय शिक्षणाच्या सुविधा जास्त प्रमाणात उपलब्ध व्हाव्यात अशी सततची मागणी वाढत आहे. तसेच वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी या राज्यातील विद्यार्थी अहमहमिकेने पुढे येत आहेत. तसेच उच्च गुण प्राप्त विद्यार्थ्यांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश न मिळाल्यामुळे व नैराश्याची भावना येण्याची शक्यता आहे. त्यामुळे जनतेमधील मागणी काही अंशी पुरी करण्यासाठी "ना अनुदान तत्त्वावर" खाजगी वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासनाने खालील नमूद केलेल्या दोन खाजगी संस्थांना "ना अनुदान तत्त्वावर" काही अटी व शर्ती बंधनकारक ठरवून खाजगी वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

1) भारती विद्यापीठ, पुणे यांना पुणे येथे.
2) डी. वाय. पाटील शिक्षण प्रसारक मंडळ यांना कोल्हापूर येथे.

३. वरील महाविद्यालयासाठी खालील अटी व शर्ती बंधनकारक राहतील :-

1) वैद्यकीय महाविद्यालयाची प्रवेश क्षमता १०० पर्यन्त राहील.
2) वार्षिक शैक्षणिक शुल्क प्रत्येक विद्यार्थ्यामागे रुपये ३०,०००/- पेक्षा जास्त आकारण्यात येऊ नये.
3) मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी जागा राखून ठेवण्याबाबत संस्थेच्या प्रवेशाबद्दल कोणताही "निर्बंध" संस्थेवर असणार नाही.
4) प्रवेश क्षमतेपैकी ८० टक्के जागा संस्थेने भराव्यात व उरलेल्या २० टक्के जागा शासन भरील.
5) एकूण प्रवेश संख्येपैकी २० टक्के जागा व्यवस्थापनाच्या इच्छेनुसार भराव्यात व या जागांसाठी विद्यार्थ्याने किमान ५० टक्के गुण मिळविलेले हवे. इंग्रजी विषयात व भौतिकशास्त्र [फिजिक्स], रसायनशास्त्र व जीवशास्त्र या विषयात मिळून ५०% पेक्षा कमी गुण असू नयेत. तसेच विद्यार्थी एकाच प्रयत्नात पास झालेला असावा.
6) साधारणपणे वैद्यकीय महाविद्यालयांच्या प्रवेशासंबंधी शासनाचे जे प्रवेश नि[illegible] आहेत, त्याच धर्तीवर खाजगी संस्थांना सुयोग्य ठरतील अशा त-हेने विहित केले जावेत.
7) विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी संस्थेने एक निवड समिती नेमावी व त्यात शासनाचा एक प्रतिनिधी असावा.

[क] स्थानिक विद्यार्थ्यांबाबत :-

संबंधित विद्यार्थी स्थानिक भागातून कोणत्याही मान्यताप्राप्त शिक्षण संस्थांमधून [१०+२] बारावीची परीक्षा किंवा तत्सम परीक्षा विज्ञान [भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र] हे विषय घेऊन इंग्रजीसह या विषयात उत्तीर्ण असावा.

[ड] इतर विद्यार्थ्यांबाबत :-

संबंधित विद्यार्थी महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त शिक्षणसंस्थांमधून [१०+२] बारावीची परीक्षा किंवा तत्सम परीक्षा विज्ञान [भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र] हे विषय घेऊन इंग्रजीसह या विषयात उत्तीर्ण असावा.

[५] विद्यार्थ्यांनी खालील दर्शविलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील :-

१. भारतीय नागरिकत्वाचे प्रमाणपत्र. [हे प्रमाणपत्र विदेशातील विद्यार्थ्यांस आवश्यक नाही.]

२. जन्मतारखेचा दाखला.

३. बारावी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

४. शाळांन्त परीक्षेचे प्रमाणपत्र.

५. बारावीच्या परीक्षेचे गुणपत्रक.

६. विद्यार्थी वैद्यकीय शिक्षण घेण्यास शारिरीकदृष्ट्या पात्र आहे किंवा नाही, याचे रजिस्टर्ड वैद्यकीय प्रॅक्टिशनरचे प्रमाणपत्र.

[६] गुणातून काही गुण वजा करण्यासंबंधी व बोनसगुण देण्यासंबंधीची जी शासनाची तरतूद आहे ती संस्थेवर बंधनकारक राहील.

[७] वागणूक व शिस्त :-

शासनाने केलेले विविध नियम व कायदे यानुसार एखादा विद्यार्थी जर राष्ट्रविघातक कार्य करतो किंवा त्यात गुंतला आहे असे जर आढळले तर संस्थेने त्या विद्यार्थ्याला काढून टाकले पाहिजे.

जर एखाद्या विद्यार्थ्याने खोटे प्रमाणपत्र किंवा माहिती किंवा खोटे प्रतिज्ञापत्र जर त्याच्या प्रवेशाच्या वेळेस दाखल केले असल्याचे आढळून आले तर त्याचा प्रवेश संस्थेने तात्काळ रद्द करावा.

एखादा संस्थेत विद्यार्थी अभ्यासक्रम पूर्ण करीत असताना रॅगिंग करीत असल्याचे आढळून आले किंवा सिध्द झाले तर अशा विद्यार्थ्यावर संस्थेने तात्काळ कार्यवाही करून प्रवेश रद्द करावा.

प्रत्येक विद्यार्थ्याकडून संस्थेने चांगल्या वागणूकीसंबंधी व नियम मान्य असल्याचे एक हमीपत्र लिहून घ्यावे.

[८] उपरोक्त संस्था जोपर्यन्त भारतीय आयुर्विज्ञान परीक्षेद्वारा मान्यताप्राप्त होऊ शकत नाही, तोपर्यन्त तेथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात बदलीने प्रवेश किंवा इतरत्र बदलीने प्रवेश मिळणार नाही हे समजले असे संस्थेने विद्यार्थ्यांकडून लेखी घ्यावे.

[९] उपरोक्त वैद्यकीय महाविद्यालयातून विद्यार्थ्यांनी आपले अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर शासन अशा विद्यार्थ्यांना नोकरीची हमी देणार नाही हे विद्यार्थ्यांना कळवावे.

[१०] उपरोक्त संस्थेने विद्यापीठाशी अभ्यासक्रमाबाबतचे संलग्नीकरण परस्पर करून घ्यावे.

=======

जी.एन.११३८९५एस

सचिव, विधानमंडळ सचिवालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
प्रबंधक, उच्च न्यायालय [ओरिजनल साईड] [पत्राद्वारे],
प्रबंधक, उच्च न्यायालय [अॅपिलेट साईड] [पत्राद्वारे],
महासंचालक, प्रसिद्धी व माहिती संचालनालय, मुंबई,
सर्व मंत्र्यांचे स्वीय सहाय्यक,
मंत्रालयीन सर्व विभाग,
शिक्षण विभाग [तांशि १/व तांशि-३, विशी-२], मंत्रालय, मुंबई,
संचालक, आयुर्वेद संचालनालय, मुंबई,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे सर्व अधिष्ठाते,
भारती विद्यापीठ, पुणे [पत्राद्वारे],
डी. डी. वाय. पाटील, शिक्षण प्रसारक मंडळ, कोल्हापूर.
कुलगुरू, पुणे विद्यापीठ, पुणे [पत्राद्वारे]
कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर [पत्राद्वारे],
निवडनस्ती.

जीएन४२८९३स्त